# पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम

काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दूरध्वनी क्र. – ०७२५२-२३४८२४
ई-मेल :- sp.washim@mahapolice.gov.in
वेबसाईट :- www.washimpolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

**• प्रेस नोट •** दि.१८.११.२०२२

## पोलीस अधीक्षक कार्यालयात श्री.गोरख भामरे यांचा निरोप समारंभ संपन्न.

***

वाशिम जिल्हा पोलीस दलामध्ये कर्तव्यास कार्यरत असलेले अपर पोलीस अधीक्षक श्री.गोरख भामरे यांची दि.०७/११/२०२२ रोजीच्या शासन आदेशांन्वये पोलीस उपायुक्त, नागपूर शहर येथे बदली झाली आहे. यानिमित्ताने पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम येथे मा.पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह यांच्या अध्यक्षतेखाली निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दि.१८.११.२०२२ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम येथील सभागृहात सदर निरोप समारंभ कार्यक्रम पार पडला. सदर कार्यक्रमास मा.पोलीस अधीक्षक, वाशिम श्री.बच्चन सिंह (IPS), सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी तसेच सर्व शाखा प्रमुख पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार उपस्थित होते. सर्वप्रथम मा.पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह यांनी अपर पोलीस अधीक्षक श्री.गोरख भामरे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार केला. नंतर उपस्थित पोलीस अधिकारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्याच्या मनोगतातून खाली नमूद भाव ओसंडून वाहत होते.

**“ सहवास सुटला म्हणजे, सोबत काही सुटत नसते,**
**निरोप दिला म्हणजे, नाते काही तुटत नसते,**
**धागे असतात जुळलेले, हृदयाचे हृदयाशी,**
**आपला माणूस दूर गेला तरी, प्रेम काही आटत नसते.. ”**

यानंतर अपर पोलीस अधीक्षक श्री.गोरख भामरे यांनी आपले मनोगत अनुभवातून स्पष्ट केले. त्यानंतर मा.पोलीस अधीक्षक श्री.बच्चन सिंह (IPS) यांनी आपल्या भाषणात श्री.गोरख भामरे यांना पुढील वाटचालीसाठी व उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम येथील पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच मंत्रालयीन अधिकारी व कर्मचाऱ्यांनी फुलांच्या पाकळ्या उधळत श्री.गोरख भामरे यांना निरोप दिला.

**(जनसंपर्क अधिकारी)**
पोलीस अधिक्षक कार्यालय,
वाशिम यांचेकरिता